सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २७९ | बुधवार, दि. १ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**

**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४४०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३१०००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११००००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २३१०/-
भाव प्रती १० ग्राम



अमळनेर : शहर विकास आघाडीच्या वतीने पालिका सभागृहात मंगळवार, दि. ३० जून रोजी झालेल्या बैठकीत शहरातील पाणीपुरवठा नियोजनासह विविध नागरी समस्यांवर पालिका मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्याशी चर्चा करताना गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील, नगरसेवक डॉ. डिगंबर महाले, विक्रांत पाटील, जितेंद्र ठाकूर, भरत ललवाणी, योगिता कापडणेकर, हाजी नसिरोद्दीन, जुबेदा आपा, नरेंद्र संदानशीव, मुक्तार खाटीक, सचिन पाटील, सौ. शोभाबाई गढरे आदी.

# अमळनेरमध्ये लवकरच ४ ते ५ दिवसांआड पाणीपुरवठ्याचे आम्ही नियोजन करू

## 'शविआ'च्या बैठकीत मुख्याधिकाऱ्यांची ग्वाही; नागरी समस्यांबाबत नगरसेवक आक्रमक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : यंदाच्या उन्हाळ्यात शहरात काही तांत्रिक अडचणींमुळे पाणीपुरवठ्याचे नियोजन कोलमडून नागरिकांना उशिरा पाणी मिळाले. परंतु आता तापी नदीतही पाणी आले असल्याने लवकरच ४ ते ५ दिवसांआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आम्ही करू. याशिवाय स्वच्छ आणि सुरळीत पाणीपुरवठा निश्चितपणे करू, अशी ग्वाही शहर विकास आघाडीच्या मंगळवार, दि. ३० जून रोजी झालेल्या बैठकीत मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी दिली. दरम्यान, नगरसेवक डॉ. डिगंबर महाले यांनी आजची बैठक राजकीय चिखलफेकीची नसून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी असल्याचे स्पष्ट केले.

पालिका सभागृहात झालेल्या या बैठकीत शहरातील नागरी समस्यांबाबत गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील व नगरसेवक चांगलेच आक्रमक झाले होते. नगरसेवकांच्या काही प्रश्नांवर अधिकारी निरुत्तर होत होते. एकंदरीत पालिकेतील सत्ताधारी व अधिकारी यांच्यात योग्य तो समन्वय नसल्यामुळेच पालिकेचा कारभार सुरळीत नसल्याचा उपस्थितांनी आरोप केला.

यंदाच्या उन्हाळ्यात संपूर्ण दोन महिने नागरिकांना ८ ते १२ दिवसांआड पाणी मिळाल्याने शहर विकास आघाडीने पालिकेवर मोर्चा नेण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, मुख्याधिकारी शिंदे यांनी मोर्चा न काढण्याबाबत दिलेल्या विनंती पत्रास मान देऊन मोर्चा स्थगित करण्यात आला होता. (पान २ वर)



### सभागृहातील घड्याळ बंद

ज्या सभागृहात सदर बैठक झाली त्याच सभागृहात पालिकेच्या बैठका होतात. सदर सभागृहातील घड्याळ बंद असल्याचे शेतकी संघाचे अध्यक्ष संजय पाटील यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे चेहरे पाहण्यालायक झाले होते.

### नगरसेवकांकडून विविध प्रश्नांची सरबत्ती

मुख्याधिकारी शिंदे यांच्याशी चर्चेवेळी सभागृहात नगरसेवकांनी शहरातील दूषित पाणीपुरवठा, तुंबलेल्या गटारी, ठिकठिकाणी पडलेले कचऱ्याचे ढीग तसेच विविध भागांतील रस्त्यांची दुरवस्थेचे व्हिडिओ दाखवत तीव्र संताप व्यक्त केला.

# गांधलीतील डंपर चोरी प्रकरणी मोठी कारवाई

## मध्य प्रदेशातून आरोपीला अटक; न्यायालयीन कोठडीनंतर जिल्हा कारागृहात रवानगी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : तालुक्यातील गांधली येथून डंपर चोरून त्याचे तुकडे करून परस्पर विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीविरुद्ध येथील पोलिसांनी मोठी कारवाई करत एका फरार आरोपीला मध्य प्रदेशातील धरमपुरी येथून अटक केली आहे. न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्यानंतर कोठडीची मुदत संपल्याने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली असून, त्याला जिल्हा कारागृहात पाठविण्यात आले आहे.

याबाबतची माहिती अशी, की गांधली येथील पेट्रोलपंपावर उभा असलेला डंपर चोरट्यांनी चोरून नेला होता. चोरीनंतर सदर डंपर एका गुदामात नेऊन त्याचे तुकडे करून विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून या प्रकरणातील आरोपी खाजूखान यास अटक केली होती. मात्र, इतर तीन आरोपी त्यावेळी फरार होण्यात यशस्वी झाले होते.

दरम्यान, फरार आरोपी फरीदखान मंजूरखान हा मध्य प्रदेशातील धरमपुरी न्यायालयात दि. २४ जून रोजी एका प्रकरणात साक्षीसाठी हजर राहणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना मिळाली. या माहितीच्या आधारे त्यांनी पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर, हवालदार मिलिंद सोनार, पोलीस शिपाई विनोद संदानशीव आणि निलेश मोरे यांचे विशेष पथक मध्य प्रदेशात रवाना केले.

पोलीस पथकाने धरमपुरी न्यायालय परिसरात सापळा रचून आरोपी न्यायालयातून बाहेर येताच त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर आरोपीला अमळनेर येथे आणून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडीदरम्यान आरोपीकडे सखोल चौकशी करण्यात आली. कोठडीची मुदत संपल्यानंतर न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली असून त्याला जिल्हा कारागृहात पाठविले आहे. या गुन्ह्यातील इतर फरार आरोपींचा शोध सुरू असून, चोरीच्या डंपरची विल्हेवाट लावण्यासाठी सहभागी असलेल्या इतर संबंधितांचीही चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# एकाच वेळी भावंड झाले डॉक्टर

## डॉ. अक्षय पाटील एम.डी., तर डॉ. अक्षता पाटील एम.बी.बी.एस. उत्तीर्ण


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर येथील बांधकाम व्यावसायिक तथा अभियंता हेमंत जिजाबराव पाटील यांच्या दोन्ही मुलांनी एकाच वेळी वैद्यकीय क्षेत्रातील पदव्या संपादन करून कुटुंबासह अमळनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. मोठा मुलगा डॉ. अक्षय यांनी एम.डी. मेडिसिन (आयुर्वेद) ही पदवी उत्कृष्ट गुणांनी प्राप्त केली, तर मुलगी डॉ. अक्षता हिने एम.बी.बी.एस. पदवी संपादन करून उल्लेखनीय यश मिळविले आहे.

डॉ. अक्षय यांनी भारती विद्यापीठ, पुणे, तर त्यांची बहीण डॉ. अक्षता हिने हैदराबाद येथून एम.बी.बी.एस. पदवी मिळविली. एकाच वेळी भाऊ आणि बहिणीने डॉक्टरकीची पदवी मिळविल्याने पाटील कुटुंबासाठी हा अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण ठरला आहे. त्यांच्या यशामागे कठोर परिश्रम, शिस्तबद्ध अभ्यास आणि पालकांचे प्रोत्साहन असल्याची भावना व्यक्त होत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ. अक्षय आणि डॉ. अक्षता यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांचे वडील हेमंत पाटील तसेच कुटुंबीयांचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून कौतुक तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.



डॉ. अक्षय पाटील



डॉ. अक्षता पाटील

# बारदान मिळाल्याने ज्वारी खरेदी पुन्हा सुरू

## दहा दिवसांच्या प्रतीक्षेनंतर शेतकऱ्यांना मिळाला दिलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : बारदानाच्या अभावामुळे गेल्या दहा दिवसांपासून रखडलेली शासकीय ज्वारी खरेदी अखेर पुन्हा सुरू झाली आहे. पाच हजार बारदान प्राप्त झाल्यानंतर २९ जून २०२६ पासून येथील शासकीय खरेदी केंद्रावर ज्वारी खरेदीला पुन्हा सुरूवात करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यावर्षी शासकीय ज्वारी खरेदीसाठी अमळनेर फ्रूटसेल सोसायटीला परवानगी देण्यात आली आहे. सुरूवातीला एक हजार, त्यानंतर आणखी एक हजार आणि नंतर नऊ हजार क्विंटल असे टप्प्याटप्प्याने ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट अमळनेर तालुक्यासाठी निश्चित करण्यात आले आहे. ज्वारीसाठी शासनाने प्रतिक्विंटल ३ हजार ६९९ रुपये हमीभाव जाहीर केला असून, आतापर्यंत एक हजार २३९ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. सुमारे साडेसात हजार क्विंटल ज्वारीची खरेदी पूर्ण झाली असून टाकरखेडा रस्त्यावरील नवीन गुदामात खरेदीसह ज्वारीचा साठा करण्यात येत आहे. मात्र, आठ ते दहा दिवसांपूर्वी ज्वारी भरण्यासाठी आवश्यक बारदान संपल्याने खरेदी बंद करण्यात आली होती. त्यामुळे एकीकडे खरेदीतील विलंब आणि दुसरीकडे खरीप हंगामातील शेतीकामे यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले होते. (पान २ वर)


> “ गेल्या आठ ते दहा दिवसांपासून बारदान नसल्याने ज्वारी साठवायला बारदान नव्हते. त्यामुळे ज्वारी खरेदी बंद करण्यात आली होती. २९ जून २०२६ पासून ज्वारीची नियमित खरेदी सुरू करण्यात आली आहे.
>
> **– सुभाष पाटील, ग्रेडर, अमळनेर.**

> “ बारदान नसणे ही शासनाची अडचण आहे. पाच हजार बारदान प्राप्त झाले आहेत. म्हणजे २,५०० क्विंटल ज्वारी खरेदी केली जाईल. बारदान कोलकता येथून मुंबईला आणले जातात. त्यानंतर मुंबईहून सर्वत्र वितरीत केले जातात.
>
> **– भागवत पाटील, चेअरमन, फ्रूटसेल सोसायटी, अमळनेर.**







माधुरीताई पाटील
उपाध्यक्षा : खा. शि. मंडळ



ॲड. रविंद्र देशमुख
हायकोर्ट, छत्रपती संभाजीनगर



श्री. निलेश भांडारकर
सामाजिक कार्यकर्ते



श्री. कल्पेश ठाकूर
अमळनेर



श्री. अभय जोशी गुरुजी
अमळनेर



श्री. मनोहर महाजन
अमळनेर




श्री. संतोष पाटील
आम आदमी पार्टी






श्री. यशवंत बोरसे
अमळनेर



श्री. सयाजीराव पाटील
अमळनेर



## संपादकीय

# गृहिणींचा सन्मान! ऐतिहासिक निर्णय

भारतासारख्या कुटुंब व्यवस्थेला वेगळे महत्त्व असलेल्या देशामध्ये घरातील गृहिणी ही किती महत्त्वपूर्ण आहे हे सर्वोच्च न्यायालयाच्या एका ताज्या निकालावरून आता अधिक ठळकपणाने स्पष्ट झाले. जगाच्या पाठीवर भारत हा असा एकमेव देश आहे की जेथे समाजव्यवस्था एका सशक्त कुटुंबपद्धतीवर आधारलेली आहे आणि या कुटुंब पद्धतीचा प्रमुख कणा त्या घरातील गृहिणी असते. भारताला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे होत आहेत आणि गेल्या काही शतकांची येथील समाजव्यवस्था पाहिली तर ती पुरुषप्रधान असल्याचे पाहावयास मिळते. शंभर वर्षांपूर्वी भारतातील स्त्रियांना घरप्रपंचात अडकवून ठेवले जात होते. आता काळ बदलला आणि भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ३० ते ४० टक्के महिला या घराबाहेर पडून नोकरी–व्यवसाय करू लागल्या. परंतु अजूनही किमान ५० ते ६० टक्के घरामध्ये त्या घरातील गृहिणी आपला प्रपंच चालविण्यासाठीच अधिक परिश्रम करीत असते. ती बाहेर नोकरी–व्यवसाय करू शकते. परंतु कुटुंबाची अनेक अर्थाने काळजी घेण्याचे काम या घरातील गृहिणी करते. मुलाबाळांच्या संगोपनाबरोबर घराची व्यवस्था टिकवून ठेवण्यात तिचा मोलाचा सहभाग असतो. आजही या घरकामामध्ये हातभार लावणाऱ्या गृहिणींची संख्या प्रचंड आहे. त्या नोकरी–व्यवसाय करीत नाहीत म्हणून त्यांचे महत्त्व कमी लेखता येणार नाही. त्यांच्याकडून होणारे घरकाम किंवा कुटुंबाची व्यवस्था यासाठी त्यांच्याकडून घेतल्या जाणाऱ्या परिश्रमाचा मोबदला ठरवायचा झाला तर तो महिना तीस हजार होऊ शकतो आणि कुठल्याही अचानकपणे उद्भवलेल्या संकटामध्ये एखाद्या घरातील गृहिणीचा मृत्यू झाला तर त्या कुटुंबाला तिचे तीस हजार मासिक उत्पन्न लक्षात घेऊन नुकसान भरपाई किंवा शासकीय मदत मिळाली पाहिजे अशा प्रकारचा अतिशय महत्त्वपूर्ण आणि आगळावेगळा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयाने देशभरातील कोट्यवधी महिलांचा खऱ्या अर्थाने सन्मान झाला आहे, असे म्हणायला हरकत नाही.

आतापर्यंतच्या पुरुषप्रधान परंपरेतील कुटुंबामध्ये घरकाम करणाऱ्या महिलेचे स्थान नेहमीच दुय्यम राहिलेले आहे. नोकरी करणारी महिला असली, तरी तिच्याविषयी दाखविला जाणारा आदर किंवा तिचे समाजातील स्थानही वेगळेपणाने स्वीकारले जाते किंवा अधोरेखित होते. खरेतर श्रमाचा, कौशल्याचा व्यवस्थापनाचा एकूणच कुटुंबाच्या आर्थिक नियोजनाचा भार हा त्या घरातील महिलेवर असतो. व्यापक अर्थाने कुटुंबाच्या व्यवस्थापनाची मोठी गुणवत्ताही तिच्याकडे असते. परंतु ती केवळ नोकरी करीत नसल्याने तिच्या या गुणवत्तेचा आदर होत नाही किंवा विचारही होत नाही. उलट ती नोकरी करीत नाही म्हटल्यानंतर तिला गृहित धरले जाते आणि मग घरातील गृहिणीने घरातील सगळी कामे केली पाहिजेत, असा अलिखित नियमच तिच्यावर लादला जातो. खरेतर वस्तुस्थिती तशी नसते. नोकरी करणाऱ्या स्त्रियांइतकीच कार्यक्षमता तिच्याकडे असते आणि तिच्या या परिश्रमाचा योग्य तो सन्मान झाला पाहिजे. तिला गृहित धरता कामा नये, असा एक व्यापक दृष्टिकोन सर्वोच्च न्यायालयाने देशापुढे ठेवला आहे. पंजाबमधील एका दुर्घटनेमध्ये एका महिलेचा मृत्यू होतो आणि तिच्या नुकसानभरपाईची मागणी करताना ती कशी देता येणार नाही याच्यावर वाद–प्रतिवाद होतो. सर्वोच्च न्यायालयाने हा प्रकार इतक्या गांभीर्याने आणि संवेदनशीलतेने हाताळला आणि नुकसान भरपाई देताना तिच्या मासिक उत्पन्नाचाच विचार करायचा असेल तर तीस हजारांपेक्षा कमी होत नाही हे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. स्वाभाविकपणे यापुढे जर असा कोणताही दुर्दैवी प्रसंग घरातील गृहिणींबाबत घडला तर तिला तीस हजार मासिक वेतन गृहित धरून नुकसान भरपाई मिळू शकेल. आता इतक्या महत्त्वाच्या निकालाबाबत केंद्र आणि राज्य सरकारने स्वतः पुढाकार घेतला पाहिजे आणि घरकाम करणाऱ्या म्हणजेच नोकरी न करणाऱ्या महिलांच्या परिश्रमाला योग्य ते आर्थिक पाळबळ दिले पाहिजे. न्यायालयाचा हा निर्णय केंद्र आणि राज्य सरकारांसाठी एक दिशानिर्देश मानता येऊ शकतो.

केंद्र आणि राज्य सरकारतर्फे महिला सशक्तीकरणाच्या वेगवेगळ्या घोषणा आता होत असतात. अगदी लाडकी बहीण योजनेपासून ते लखपती दिदीपर्यंत महिलांना रोजगाराच्या संधी देण्यासाठी प्रयत्न होतो. परंतु जवळपास दीडशे कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात समाज कितीही पुढारला, आधुनिक झाला तरी पुढची पाच पन्नास वर्षे गृहिणी म्हणून स्वयंस्फूर्तीने कुटुंबाची जबाबदारी सांभाळणाऱ्या महिलांची संख्या मोठीच राहणार आहे. कारण ती एकूणच कुटुंब व्यवस्थेचा महत्त्वपूर्ण आधार ठरते. आज तर अगदी शिकल्या–सवरलेल्या उच्चशिक्षित महिला काही काळ नोकरी करून स्वेच्छानिवृत्ती घेतात आणि आपल्या कुटुंबाकडे लक्ष देण्याची भूमिका स्वीकारतात. एकूणच कुटुंब व्यवस्था आणि समाज व्यवस्थेसाठी कुटुंबातील गृहिणीचे स्थान हे अनन्यसाधारण राहणार आहे. तिला जर अशा प्रकारचे आर्थिक संरक्षण वेगवेगळ्या योजनांमार्फत मिळाले तर ते तिच्यासाठी अधिक सहाय्यभूत ठरणार आहे. दुर्दैवाने महिला सक्षमीकरणाच्या घोषणा जरी होत असल्या, तरी अजूनही महिलांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात कोणताही अमूलाग्र बदल झाल्याचे दिसत नाही. त्याचे ठळक उदाहरण सर्वोच्च न्यायालयापुढे आलेली हीच पंजाबची केस आहे. नुकसान भरपाई मागणारा हा खटला तेवीस वर्षांपूर्वी न्यायालयात दाखल झाला होता. त्याबाबतचा निर्णय आता इतक्या उशिरा झालेला आहे. यावरून महिलांसदर्भातील दृष्टिकोन फार बदलला नसल्याचेच निदर्शक ठरते. आपल्या देशातील न्यायालयीन प्रक्रिया ही प्रचंड लांबलचक आणि गुंतागुंतीची आहे. न्याय मिळणे तर दूरच राहते. परंतु झालेला अन्याय समजावून सांगण्यासाठीच अनेकांची शक्ती, पैसा खर्च होत असतो. ही परिस्थिती बदलण्याचीदेखील आवश्यकता आहे.

## बारदान मिळाल्याने ज्वारी खरेदी पुन्हा सुरू

पान १ वरुन

दरम्यान, शासकीय मका खरेदीसाठी ऑनलाइन केवळ ३२ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. मक्यासाठी शासनाने प्रतिक्विंटल २ हजार ४०० रुपये हमीभाव जाहीर केला असला, तरी बाजार समितीत २ हजार २०० ते २ हजार २५० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत असल्याने शेतकरी शासकीय केंद्रावर मका विक्रीसाठी पुढे आलेले नाहीत. त्यामुळे मका खरेदी अद्याप सुरू झालेली नाही.

# शंभर, दोनशे रुपयांच्या नोटांबाबत नवा ट्रेंड!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्या १०० आणि २०० रुपयांच्या नोटांसंदर्भात एक नवा ट्रेंड पाहायला मिळत आहे. लोक पूर्वीपेक्षा आता मोठ्या प्रमाणात आपल्या घरामध्ये १०० आणि २०० रुपयांच्या नोटा साठवून ठेवताना दिसत आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये १०० आणि २०० रुपयांच्या नोटांची मागणी वाढली आहे. लोक आपल्या घरात १०० आणि २०० रुपयांच्या नोटा साठवून ठेवत आहेत, याचा अर्थ हा नाही की बाजारात या नोटांचा तुटवडा आहे. मात्र, खबरदारी म्हणून लोक आता आपल्या घरांमध्ये रोख रक्कम अधिक ठेवताना दिसत आहेत.




### लोक घरात अधिक रोकड का ठेवत आहेत?

मीडिया रिपोर्टनुसार अमेरिका आणि इराण युद्धामुळे पश्चिम आशियामध्ये तणाव प्रचंड वाढला आहे. यामुळे जागतिक अस्थिरता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून आता लोकांनी आपल्याजवळ अधिक रोकड बाळगण्यास सुरूवात केली आहे. ज्यामध्ये सर्वाधिक प्रमाणात १०० आणि २०० रुपयांच्या नोटांचा समावेश आहे. जेव्हा–जेव्हा अशी परिस्थिती निर्माण होते, जागतिक अस्थिरता निर्माण होते, तेव्हा लोकांचा कल हा अधिकाधिक प्रमाणात रोकड जवळ ठेवण्याकडे वाढतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. लोक आपल्या दैनंदिन गरजांसाठी ऑनलाईन ऐवजी रोख पैशांचा वापर करतात. यामुळेच सध्या भारतामध्ये लोक १०० आणि २०० रुपयांच्या चलणी नोटा घरात साठवून ठेवत असल्याचे पाहावयास मिळत आहे.

### 'कोरोना'नंतर परिस्थिती बदलली

मीडिया रिपोर्टनुसार 'कोरोना'नंतर ही परिस्थिती बदलल्याचे पाहावयास मिळत आहे. 'कोरोना'नंतरच्या काळात रोख स्वरूपात केलेल्या व्यवहारांमध्ये वाढ झाली आहे, तर ऑनलाईन व्यवहारांचे प्रमाण तुलनेने थोडे कमी झाले आहे. आपत्कालीन परिस्थितीमध्ये लोक अशा पद्धतीचा व्यवहार करू शकतात. याचा अर्थ हा नाही की लोकांचा ऑनलाईन पेमेंट सिस्टीमवरील विश्वास कमी झाला आहे, ऑनलाईन व्यवहार देखील झपाट्याने वाढत आहेत. परंतु दुसरीकडे पैशांच्या कॅश स्वरूपातील व्यवहारांमध्ये देखील वाढ झाल्याचे पाहावयास मिळत आहे.

## लोकांनी रोख रक्कम घरात साठविण्यास का सुरूवात केली?

### राज्यात १००, २०० रुपयांच्या नोटांचा तुटवडा आहे का?

राज्यात १००, २०० रुपयांच्या नोटांचा तुटवडा आहे का? तर या प्रश्नाचे उत्तर राज्यात किंवा देशात कोणत्याही नोटांचा तुटवडा नाही, सरकारने तसे ऑफिशियली जाहीर केलेले नाही, भारतीय रिझर्व्ह बँकेत चलनाचा मोठा साठा उपलब्ध आहे. मात्र, सध्याची परिस्थिती पाहता लोक काही प्रमाणात घरामध्ये १००, २०० च्या नोटांचा साठा करताना दिसत आहेत. ▲

# आशाबाई पाटील, सुनीतातार्इ भिल यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार

## पाडळसरे ग्रामपंचायतीने घेतली उल्लेखनीय कार्याची दखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या वर्षीपासून महाराष्ट्र शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रत्येक ग्रामपंचायतीने दोन कर्तबगार महिलांचा 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार' देऊन गौरव करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार गावातील कर्तबगार व उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पाडळसरे ग्रामपंचायतीतर्फे मंगळवार, दि. ३० जून रोजी सकाळी सभागृहात सौ. आशाबाई वसंतराव पाटील व सौ. सुनीताताई अशोक भिल यांना थोर समजसेविका अहिल्याबाई होळकर गौरव पुरस्कार देऊन सरपंच सौ. शुभांगीताई पाटील, ग्रामसेवक सुभाष भोई व मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.




*अमळनेर : सौ. आशाबाई वसंतराव पाटील यांना मंगळवार, दि. ३० जून रोजी अहिल्याबाई होळकर पुरस्कार देऊन सन्मानित करताना सरपंच शुभांगी पाटील. शेजारी ग्रामसेवक सुभाष भोई, भागवत पाटील, विश्वास कोळी आदी.*

पाडळसरे ग्रामपंचायततर्फे सन २०२५–२६ या वर्षाचा फक्त महिलांना दिला जाणारा प्रतिष्ठित अहिल्याबाई होळकर महिला सन्मान पुरस्कार चामुंडामाता शेतकरी गट व महिला बचत गटाच्या अध्यक्षा सौ. आशाबाई पाटील व सौ. सुनीताताई भिल यांना एकत्रित करून सबलीकरण व सशक्तीकरण, आध्यात्मिक व सामाजिक कार्याबद्दल शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्रसह ५०१ रुपयांचा धनादेश देऊन सरपंच तथा प्रशासक सौ. शुभांगीताई पाटील व ग्रामसेवक सुभाष भोई यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यंदाच्या पुरस्कारासाठी सौ. आशाबाई पाटील यांनी महिला बचत गट, शेतकरी महिला गट स्थापन करून विविध योजनांतर्गत आर्थिक मदतीतून सबलीकरण केल्याबद्दल, तर सौ. सुनीताताई भिल यांनी विविध सेवा संस्थांच्या माध्यमातून शेती क्षेत्रात महिलांचे योगदान वाढविण्यासह महिलांना आधुनिक शेतीचे योग्य मार्गदर्शन केल्याने ग्रामपंचायत निवड समितीतर्फे निवड करण्यात आली.

यावेळी सरपंच सौ. शुभांगीताई पाटील, ग्रामसेवक भोई, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत पाटील, प्रगतीशील शेतकरी विकास पाटील, विकास सोसायटीचे सचिव रणछोड पाटील, माजी सरपंच सचिन पाटील, पत्रकार वसंतराव जिभाऊ पाटील, विश्वास कोळी, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे भूषण पाटील, माजी उपसरपंच प्रभाकर पाटील, भटू पाटील, हेमंत राठोड, भावना पाटील, कैलास कोळी, सामाजिक कार्यकर्ते सागर कोळी यांची व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

भागवत पाटील यांनी सूत्रसंचालन केले. माजी सरपंच सचिन पाटील यांनी आभार मानले. ▲

## 'अमळनेरमध्ये लवकरच ४ ते ५ दिवसांआड पाणीपुरवठ्याचे आम्ही नियोजन करू'

पान १ वरून

यासंदर्भात मुख्याधिकाऱ्यांनी प्रशासकीय बैठक बोलवावी, अशी मागणी गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील यांनी केल्याने दि. ३० जून रोजी सकाळी ११ वाजता ही बैठक घेण्यात आली. या बैठकीत विस्कळीत पाणीपुरवठा, टाकी सफाईनंतरही होत असलेला अशुद्ध पाणीपुरवठा, गटारी तुंबल्याने पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात साचणारे पाणी, भुयारी गटार, पाणीपुरवठा टीडीएस व प्रामुख्याने घनकचरा संकलन करणाऱ्या घंटागाडीतून मृतदेहाची वाहतूक, सफाई कामगारांचे मनमानी समायोजन, काही ठेकेदारांची अक्षम्य कर्तव्य कसुरी आदी समस्या नगरसेवकांनी अत्यंत आक्रमकतेने मांडल्या. विशेषतः विस्कळीत, अशुद्ध व अनेक प्रकारच्या साथीच्या आजारांना कारणीभूत ठरणारा पाणीपुरवठा आणि घंटागाडीतून झालेली मृतदेहाची वाहतूक या प्रश्नांवर साऱ्यांनी अधिकारी वर्गास चांगलेच धारेवर धरले. घनकचरा ठेकेदारास ब्लॅक लिस्टमध्ये टाकून गुन्हे दाखल करावेत तसेच वर्षानुवर्षे पाण्याच्या टाक्या साफ न करता नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी केली.

प्रामुख्याने सौ. जयश्रीताई पाटील यांच्यासह नगरसेवक डॉ. डिगंबर महाले, विक्रांत पाटील, जितेंद्र ठाकूर, भरत ललवाणी, योगिता कापडणेकर, हाजी नसिरोद्दीन, जुबेदा आपा, नरेंद्र संदानशीव, मुक्तार खाटीक, सचिन पाटील, सौ. शोभाबाई गढरे यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. तर इतर नगरसेवकांनी आपापल्या प्रभागातील समस्या मांडल्या.

### शहरात मिळते चक्क ४०० टीडीएसचे पाणी

अमळनेर शहरात सध्या नागरिकांना मिळत असलेल्या पाण्याचे टीडीएस किती हे तपासण्यासाठी प्रत्यक्ष टाकीतील पाणी बाटलीत आणून सभागृहातच ते चेक करण्यात आले असता त्याचे टीडीएस चक्क ४०० पर्यंत आले. हे पाणी पिण्यायोग्य आहे का, हे पाणीपुरवठा अभियंत्यांना विचारले असता ते निरुत्तर झाले. खरे पाहता जास्तीत जास्त २०० ते २५० टीडीएस पाणी असायला हरकत नाही. परंतु ४०० पर्यंत टीडीएस जात असेल तर लोकांच्या जीवाशी खेळ करू नका, याकडे लक्ष घालून नागरिकांना स्वच्छ आणि निर्जंतुक पाणी द्या, अशी मागणी सर्वांनी केली.

शेवटी मुख्याधिकारी शिंदे यांनी सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे देताना लवकरच पाणीपुरवठा सुरळीत करण्याची ग्वाही दिली व इतर प्रश्नांवर देखील गांभीर्याने कार्यवाही करण्याची हमी देत नागरी समस्यांबाबत प्रशासन कोणतीही कसूर करणार नाही, असे आश्वसित केले.

सदर बैठकीस मुख्यधिकारी शिंदे, पाणीपुरवठा अभियंता सत्यम पाटील, प्रवीणकुमार बैसाणे, आरोग्य निरीक्षक संतोष माणिक, किरण कंडारे, बांधकाम अभियंता सचिन गवांदे, दिवाबत्ती अभियंता कुणाल महाले, वसुली विभागाचे लौकिक समशेर, वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास महाजन, सभा लिपिक प्रमोद लटपटे; तर 'शविआ'च्या वतीने गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील, नगरसेवक डॉ. डिगंबर महाले, नगरसेविका सौ. योगीताताई कापडणेकर, जुबेदाबी नसिरोद्दीन हाजी, अफसाना खाटीक, सौ. नंदाताई संदानशीव, सौ. शोभाबाई गढरे, विजय पाटील, सचिन पाटील, देवेंद्र कांबळे, भरत ललवाणी, माजी नगरसेवक नरेंद्र चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन राजपूत, समाजसेवक जितेंद्र ठाकूर, विक्रांत पाटील, नरेंद्र संदानशीव, मुक्तार खाटीक, नसिरोद्दीन हाजी, विजय राजपूत, सयाजीराव कापडणेकर, भूषण भदाणे, सुनील शिंपी, संजय पुनाजी पाटील, गौरव महाजन आणि शुभम पाटील उपस्थित होते.

## झामी चौक, बालाजीपुरा, मंगलादेवी चौकात साचले पाणी; नागरिक त्रस्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांना झोडपून काढले असून झामी चौक, मंगला देवी चौक, बालाजीपुरा परिसरात पुन्हा एकदा पाण्याचे साम्राज्य पाहायला मिळाले. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांना ये–जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसरातील रस्ते अक्षरशः तलावाचे स्वरूप धारण करत असल्याने वाहनचालक आणि पादचारी त्रस्त झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार अवघ्या पाच दिवसांपूर्वी शहरातील देवी चौक व पवन चौक परिसरातील मुख्य गटारींमधील गाळ काही प्रमाणात काढण्यात आला होता. मात्र, घरांसमोर मोठ्या गटारींवर स्लॅब टाकला आहे,



तर लहान गटारीद्वारे पाण्याचा निचरा होऊन त्या ठिकाणी पाण्याचे मोठे डबके तयार झाल्याने प्रश्न उद्भवला. गटारांची साफसफाई पूर्णपणे प्रभावी होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण होऊन पाणी थेट रस्त्यावर साचत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. दरवर्षी पावसाळ्यात झामी चौकासह बालाजीपुरा, मंगलादेवी चौकासह काही भागांत हीच परिस्थिती निर्माण होत असून संबंधित यंत्रणेकडून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. ▲

# दिवसभर मोबाईल वापरता? मग सावध व्हा

## शरीरात शांतपणे सुरू होतात 'हे' १० बदल, आरोग्यावर होतो मोठा परिणाम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या काळात मोबाईल फोन आपल्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग बनला आहे. ऑफिसचे काम असो, अभ्यास, सोशल मीडिया, ऑनलाइन खरेदी किंवा मनोरंजन – जवळपास प्रत्येक कामासाठी लोक तासन्‌तास मोबाईलचा वापर करतात. पण गरजेपेक्षा जास्त स्क्रीन टाइम तमच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करू शकतो.

तज्ज्ञांच्या मते दीर्घकाळ मोबाईलचा अतिवापर केल्याने शरीर आणि मन या दोन्हींवर वाईट परिणाम होऊ शकतो. जर तुम्हीही दिवसभर मोबाईल वापरत असाल, तर त्यामुळे कोणत्या आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात आणि त्यापासून कसे वाचायचे, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

### डोळ्यांवर वाईट परिणाम होतो

सतत मोबाईलच्या स्क्रीनकडे पाहिल्यामुळे डोळ्यांची जळजळ, कोरडेपणा, धूसर दिसणे आणि डोकेदुखी यांसारख्या समस्या होऊ शकतात. जास्त वेळ स्क्रीन पाहिल्यामुळे डोळ्यांवर ताणही वाढतो.

### झोपेवर परिणाम होऊ शकतो

रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरल्याने स्क्रीनमधून निघणारा निळा प्रकाश (ब्लू लाईट) झोपेसाठी आवश्यक हार्मोनच्या निर्मितीवर परिणाम करतो. त्यामुळे झोप येण्यास उशीर होतो आणि झोपेची गुणवत्ता कमी होते.

### मान आणि पाठदुखी

मोबाईलकडे सतत खाली मान करून पाहिल्यामुळे मान,



खांदे आणि पाठीच्या स्नायूंवर ताण येतो. त्यामुळे मानदुखी आणि पाठदुखीची समस्या वाढू शकते.

### मानसिक ताण वाढू शकतो

वारंवार सोशल मीडिया पाहणे, सतत नोटिफिकेशन येणे आणि स्क्रीनवर जास्त वेळ घालवणे यामुळे ताण, चिंता आणि मानसिक थकवा वाढू शकतो.

### लक्ष आणि स्मरणशक्तीवर परिणाम

मोबाईलचा अतिवापर केल्यामुळे एकाग्रता कमी होऊ शकते. सतत येणाऱ्या नोटिफिकेशनमुळे – काम किंवा अभ्यासात लक्ष केंद्रित करणे कठीण होते.

### शारीरिक हालचाल कमी होते

तासन्‌तास मोबाईल वापरल्यामुळे चालणे–फिरणे कमी होते. त्यामुळे लठ्ठपणा, अशक्तपणा आणि जीवनशैलीशी संबंधित अनेक आजारांचा धोका वाढतो.

### अंगठा आणि मनगट दुखू शकते

सतत टायपिंग आणि स्क्रोलिंग केल्यामुळे अंगठा, बोटे आणि मनगटात वेदना किंवा कडकपणा जाणवू शकतो.

### सोशल मीडियाचे व्यसन लागू शकते

मोबाईलचा अतिवापर केल्यामुळे सोशल मीडिया आणि गेमिंगचे व्यसन लागू शकते. याचा वैयक्तिक आणि कौटुंबिक आयुष्यावरही परिणाम होऊ शकतो.

### ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम

दीर्घकाळ मोठ्या आवाजात इअरफोन किंवा हेडफोन वापरल्यामुळे ऐकण्याची क्षमता कमी होऊ शकते.

### मानसिक आणि शारीरिक थकवा

सतत स्क्रीनकडे पाहिल्यामुळे मेंदूला पुरेशी विश्रांती मिळत नाही. त्यामुळे थकवा, चिडचिड आणि काम करण्याची क्षमता कमी होऊ शकते.

### मोबाईल वापरताना या गोष्टी लक्षात ठेवा

प्रत्येक २० मिनिटांनी २० सेकंदांसाठी २० फूट अंतरावरील वस्तूकडे पाहा (२०–२०–२० नियम).

झोपण्याच्या किमान १ तास आधी मोबाईल वापरणे बंद करा.

– स्क्रीन टाइम मर्यादित ठेवा.

– ब्लू लाईट फिल्टरचा वापर करा.

– नियमित व्यायाम करा आणि पुरेशी झोप घ्या. ▲

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# इंटरनेट नसलेल्या गावातील मुलाची अंतराळात झेप!

सक्सेस स्टोरी

## केवळ पुस्तके आणि अफाट कुतूहलाच्या जोरावर रचला नवा इतिहास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गरज ही शोधाची जननी मानली जाते. अनेकदा प्रतिकूल परिस्थितीत मोठे शोध किंवा संशोधन झाल्याचे समोर आले आहे. २१ वे शतक हे तंत्रज्ञानाचे शतक मानले जाते. पण या काळात जर एखादा विद्यार्थी आठवीपर्यंतचे शिक्षण घेईपर्यंत त्याच्या भागात इंटरनेट पोहोचले नसेल तर ती खूपच प्रतिकूल स्थिती मानली जाते. आजच्या डिजिटल युगात जिथे हाय-स्पीड इंटरनेट आणि एआय शिवाय विद्यार्थ्यांचे पानही हलत नाही तिथे एका साध्या गावांतील मुलाने केवळ पुस्तके आणि अफाट कुतूहलाच्या जोरावर अंतराळ क्षेत्रात एक नवा इतिहास रचला आहे. विशेष म्हणजे ही घटना इतर कोणत्या देशातील नसून भारतातील आहे. कर्नाटकातील एका छोट्याशा गावात वाढलेल्या अवैस अहमद या तरुण उद्योजकाच्या पिक्सेल या स्पेस-टेक स्टार्टअपची कामगिरी आज जागतिक पातळीवर कौतुकाचा विषय ठरत आहे.

### इंटरनेट नाही, फक्त विश्वकोश आणि स्वप्ने!

कर्नाटकातील चिक्कमंगळुरू जिल्ह्यातील आलदूर या छोट्याशा गावात अवैसचे बालपण गेले. इयत्ता आठवीत जाईपर्यंत त्याला इंटरनेट काय असते हेही माहीत नव्हते. पण त्याचे अंतराळाबद्दलचे वेड पाहून त्याच्या वडिलांनी त्याला ग्रहांची आणि विश्वाची माहिती देणारे जागतिक विश्वकोश आणून दिले. इंटरनेट नसताना याच पुस्तकांनी अवैसच्या कल्पकतेला पंख दिले आणि तो सतत नवीन प्रश्न विचारत मोठा झाला. पुढे बिट्स पिलानी येथे गणिताचे शिक्षण घेत असताना त्याच्या या जिज्ञासू वृत्तीला व्यावसायिक आकार मिळाला. तिथे त्याने इस्रोच्या सहकार्याने चालणाऱ्या टिम अनंत या उपग्रह प्रकल्पात भाग घेतला. तसेच एलॉन मस्क यांच्या स्पेसएक्स हायपरलूप पोड स्पर्धेत फायनलपर्यंत पोहोचलेल्या भारतीय संघाचे त्याने अभियांत्रिकी नेतृत्वही केले. एका वर्षाची अतिरिक्त पदवी घेण्याऐवजी, त्याने स्वतःची कंपनी स्थापन करण्याचा धाडसी निर्णय घेतला.

### ...आणि पिक्सेलचा जन्म झाला!

२०१८ मध्ये एका राष्ट्रीय स्पर्धेत काम करत असताना, अवैस आणि त्याचा वर्गमित्र क्षितिज खंडेलवाल यांना पिकांच्या आरोग्याचा अचूक अंदाज लावण्यासाठी उपग्रहाच्या स्पष्ट चित्रांची गरज भासली. पण तसा डेटा जगात कुठेच उपलब्ध नव्हता. सामान्य उपग्रह पृथ्वीचे जे फोटो घेतात, त्यातून पिकांचे रोग, वायू गळती किंवा प्रदूषण



सुरूवातीच्या काळात ओळखता येत नव्हते. या समस्येवर मात करण्यासाठी या दोघांनी स्वतःच प्रगत उपग्रह बनवण्याचा निर्णय घेतला. वडिलांकडून घेतलेले उसने पैसे आणि महिन्याला अवघ्या १० हजार रुपयांत गुजराण करत, वयाच्या विशीतच त्यांनी फेब्रुवारी २०१९ मध्ये पिक्सेल कंपनीची स्थापना केली.

### हायपरस्पेक्ट्रल तंत्रज्ञानाने जगाला थक्क केले

पिक्सेलने हायपरस्पेक्ट्रल इमेजिंग तंत्रज्ञानात क्रांती घडवून आणली आहे. सामान्य सॅटेलाइटच्या तुलनेत पिक्सेलचे सॅटेलाइट पृथ्वीची २५० हून अधिक स्पेक्ट्रल बँड्समध्ये आणि अत्यंत अचूक (५-मीटर रिझोल्यूशन) चित्रे टिपतात. म्हणजेच पारंपारिक उपग्रहांपेक्षा ५० पट अधिक माहिती याद्वारे मिळते.

### या तंत्रज्ञानाचे फायदे

**शेती क्षेत्राला वरदान :** पिकांवर पडणारी कीड किंवा रोग प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसण्याच्या काही आठवडे आधीच ओळखता येतो.

**पर्यावरण रक्षण :** विषारी वायूंची गळती, कारखान्यांचे प्रदूषण आणि नद्यांमधील घाण अचूक शोधता येते.

**सुरक्षा :** बेकायदेशीर खाणकाम आणि पर्यावरणाची होणारी हानी रोखता येते.

### गुगलचे पाठबळ अन् नासासोबत ऐतिहासिक करार!

पिक्सेलने आतापर्यंत गुगल, रेडिकल व्हेंचर्स आणि लाईटस्पीड यांसारख्या जागतिक गुंतवणूकदारांकडून तब्बल ९५ दशलक्ष डॉलर्स (सुमारे ८०० कोटी रुपये) निधी उभा केला आहे. कंपनीने नुकतेच आपले सर्व ६ फायरफ्लाय उपग्रह अंतराळात यशस्वीपणे प्रक्षेपित केले आहेत. नासासोबत व्यावसायिक करार करणारा पिक्सेल हा भारतातील पहिला स्पेस स्टार्टअप ठरला आहे. तसेच अमेरिकेच्या नॅशनल रेकॉनिसन्स ऑफिससोबत ५ वर्षांचा करार झाला आहे.

### जागतिक स्तरावर गौरव

अवैस अहमद आणि क्षितिज खंडेलवाल यांच्या या कामगिरीची जगभरात दखल घेतली गेली आहे. टाईम मासिकाने २०२३ मधील सर्वोत्कृष्ट शोधांमध्ये पिक्सेलचा समावेश केला होता. तसेच अवैसचे नाव फोर्ब्स ३० अंडर ३०, एमआयटी इनोव्हेटर्स अंडर ३५ आणि फॉर्च्युन इंडिया ४० अंडर ४० या प्रतिष्ठित याद्यांमध्ये झळकले आहे.

अवैस अहमदची ही यशोगाथा आजच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. शिकण्यासाठी महागड्या तंत्रज्ञानाची नव्हे, तर मनात तीव्र कुतूहल आणि काहीतरी करून दाखवण्याची जिद्द असण्याची गरज असते, हेच या तरुणाने सिद्ध करून दाखवले आहे. एका छोट्या गावातील पुस्तकांमधून सुरू झालेला हा प्रवास आज थेट अंतराळात पोहोचला आहे.

## घरात मनी प्लांट वाढविताना ‘या’ गोष्टी लक्षात ठेवा...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मनी प्लांट किंवा पोथोस हे घरात लावण्यासाठीचे लोकप्रिय रोप आहे. पण मनी प्लांटची वाढ चांगली व्हावी आणि पानेही मोठी व हिरवीगार रहावीच यासाठी काळजी घेणेही महत्त्वाचे असते.



### खूप पाणी देणे टाळा

कुंडीतील माती २ इंच पूर्ण कोरडी जाणवल्याशिवाय पाणी देऊ नका. उन्हाळ्यात आठवड्यातून २-३ वेळा आणि हिवाळा व पावसाळ्यात ५-६ दिवसांतून एकदा पाणी पुरेसे होते.

### पाण्याचा निचरा

अतिरिक्त पाणी साचून न राहाता निघून जाण्यासाठी कुंडीच्या तळाला छिद्र राहूद्या. अतिपाण्यामुळे मुळे कुजून मनी प्लांट खराब होण्याचा धोका असतो.

### अप्रत्यक्ष सूर्यप्रकाश

मनी प्लांटला अप्रत्यक्ष सूर्यप्रकाश जास्त योग्य असतो. थेट उन्हामुळे पाने पिवळी पडू शकतात. त्यामुळे घरात खिडकीजवळ किंवा चांगली हवा आणि उजेड असेल, अशा बाल्कनीत हे झाड छान वाढते.

मनी प्लांटसाठी कुंडीच्या मध्ये मॉस स्टिक म्हणजे मॅट किंवा नारळाच्या शेंडीची काठी लावली तर वेलीला हवेत फुटणारी मुळं या स्टिकमध्ये रुजतात. यामुळे झाला जास्त पोषण मिळते आणि पानांचा आकारही मोठा होतो.

### खत

मनी प्लांटला फार खताची आवश्यता नसते. पण महिन्यातून एकदा गांडूळ खत थोडे देऊ शकता. तसेच वापरलेली चहापत्ती धुवून वाळवून मातीत टाकू शकता.

### छाटणी

वेळोवेळी पिवळी आणि सुकलेली पाने काढून टाका. जर प्लांट लांब आणि पातळ होत असेल, तर वरचे टोक थोडे कापा. ज्यामुळे नवीन फांद्या फुटतात.

### कडक थंडी किंवा अतिखत टाळा

पाने काळी पडण्याचे कारण कडक थंडी किंवा अतिखतही असू शकते, त्यामुळे ही परिस्थितीही टाळता येऊ शकते.

### धूळ साफ करा

याशिवाय पानांवरील धूळही साफ करा, धूळ साचल्यास प्रकाशसंश्लेषण चांगले होत नाही.

### राइस वॉटर

महिन्यातून एकदा मनी प्लांटला राइस वॉटर (धुतलेले तांदळाच्या दुप्पट पाणी) देऊ शकतो. त्यामुळे पाने चमकदार आणि निरोगी दिसतात.

### योग्य कुंडी

रोपाला पुरेशी मोठी कुंडी वापरा. ज्यामुळे मुळांना वाढ होण्यासाठी जागा मिळेल.

## भात खाल्ल्यावर झोप का येते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दुपारच्या जेवणात भात खाल्ल्यावर जर तुमचे डोळे जड होऊ लागले किंवा तुम्हाला काम करताना अचानक झोप येऊ लागली, तर हे फक्त तुमच्याच बाबतीत होते, असे अजिबात नाही. भात खाल्ल्यानंतर बऱ्याच लोकांना सुस्ती आणि आळस जाणवतो. याकडे अनेकदा सामान्य म्हणून दुर्लक्ष केले जाते, परंतु यामध्ये शरीरातील काही वैज्ञानिक प्रक्रियांचा समावेश आहे.

### वैज्ञानिक कारणे

**१) कर्बोदकांचे प्रमाण :** आहाराशी संबंधित विषयांवर माहिती देणाऱ्या तज्ज्ञांच्या मते पांढऱ्या भातामध्ये कर्बोदकांचे प्रमाण जास्त असते. जेव्हा आपण भात खातो, तेव्हा शरीर त्याचे ग्लुकोजमध्ये रूपांतर करते. ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वेगाने वाढते. सुरूवातीला यामुळे ऊर्जा मिळते, परंतु काही वेळानंतर ही ऊर्जा अचानक कमी होते. यामुळे बऱ्याच लोकांना थकवा येतो आणि झोप येते.

**२) ग्लायसेमिक इंडेक्स :** पांढऱ्या भाताचा ग्लायसेमिक इंडेक्सदेखील तुलनेने जास्त असतो. याचा अर्थ असा की शरीरात तो लवकर पचतो आणि रक्तातील साखर लवकर वाढवतो. जेव्हा साखरेची पातळी वेगाने वाढते आणि कमी होते तेव्हा शरीराला सुस्ती जाणवू लागते.

**३) इन्सुलिन आणि हार्मोन्स :** भात खाल्ल्यानंतर शरीरातील इन्सुलिनची पातळीदेखील वाढते. इन्सुलिन रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करण्यास मदत करते. या प्रक्रियेदरम्यान ‘ट्रिप्टोफॅन’ नावाचे अमिनो आम्ल अधिक प्रमाणात मेंदूपर्यंत पोहोचू शकते. ट्रिप्टोफॅन हे ‘सेरोटोनिन’ आणि ‘मेलाटोनिन’ सारखे हार्मोन्स तयार करण्यास मदत करते, जे मनस्थिती आणि झोपेचे नियमन करतात. म्हणूनच भात खाल्ल्यानंतर अनेक लोकांना झोप येते.

**४) पचन संस्थेवर ताण :** भात खाण्याचे प्रमाण देखील महत्त्वाची भूमिका बजावते. एकाच वेळी खूप जास्त भात खाल्ल्याने किंवा त्यासोबत जड किंवा तळलेले पदार्थ खाल्ले तर पचन संस्थेवर अतिरिक्त ताण येतो. यामुळे पचन क्रियेत अधिक ऊर्जा खर्च होते आणि थकवा येतो.

### उपाय

भात खाल्ल्यानंतर येणारी झोप हा आजार नसला, तरी त्याचा दैनंदिन कामावर नक्कीच परिणाम होतो. हे टाळण्यासाठी खालील गोष्टी करा.


- **मर्यादित सेवन :** भाताचे सेवन मर्यादित करा.
- **प्रथिनयुक्त आहार :** तुमच्या आहारामध्ये डाळी, पनीर (चीज), अंडी किंवा इतर प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश करा.
- **फायबर :** फायबरयुक्त भाज्या खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी राखण्यास मदत होईल.
- **चालणे :** भात खाल्ला असेल तर जेवणानंतर साधारण १० ते १५ मिनिटे तुम्ही हलका व्यायाम करा किंवा थोडे चाला. हे सोपे आणि फायदेशीर मानले जाते.


तुम्ही जर या गोष्टी केल्या, तर भात खाल्ल्यानंतर तुम्हाला नक्कीच झोप येणार नाही.

## रोजच्या आहारातील ‘या’ पदार्थामुळे वाढतो कॅन्सरचा धोका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोणताही पदार्थ खाताना त्यांचे प्रमाण लक्षात घेणे खूप महत्त्वाचे असते. एखाद्या पदार्थाचे जास्त प्रमाणात सेवन केल्यामुळे ते शरीराला घातक ठरू शकते. त्यामुळे रोजच्या आहारातील पदार्थ खाताना विशेष काळजी घ्यावी.





### प्रक्रिया केलेले मांस

स्मोकिंग, क्युरिंग किंवा मीठ लावून टिकवून ठेवलेले मांस आरोग्यास घातक असते. उदा. हॉट डॉग्ज हे पदार्थ खाणे टाळा.

### तळलेले पदार्थ

स्टार्च असलेले पदार्थ खूप उच्च तापमानावर शिजवल्याने ‘ॲक्रिलामाइड’ नावाचे कर्करोगजन्य ठरू शकणारे संयुग तयार होते. मांस आगीवर थेट भाजल्याने HCAs आणि PAHs सारखी हानिकारक रसायनेही तयार होतात.

### मद्यपान

मद्यपान हे यकृत, तोंड, स्तन आणि आतड्यांच्या कर्करोगासह अनेक प्रकारच्या कर्करोगांसाठी घातक ठरते.

### गोड पदार्थ

पोषक तत्त्वे नसलेली थंड आणि गोड पेय पिऊ नका. उदा.- सोडा, कोल्ड ड्रिंक साखरयुक्त पदार्थांचे अतिसेवन यामुळे लठ्ठपणा येतो आणि शरीरात दीर्घकालीन दाह निर्माण होतो.

### अति-प्रक्रिया केलेले पदार्थ

मोठ्या प्रमाणावर प्रक्रिया केलेल्या पदार्थांमध्ये अनेकदा फायबरचे प्रमाण कमी असते, पोषक मूल्यांचा अभाव असतो आणि हानिकारक ॲडिटिव्ज असतात. या सर्व गोष्टींचा संबंध कर्करोगाच्या गाठी तयार होण्याच्या वाढत्या धोक्याशी जोडला जाऊ शकतो.

### कृत्रिम रंग- फास्ट फूड

फास्ट फूड आणि स्ट्रीट फूड खाणे कमी करा आणि शक्य असल्यास टाळा. पदार्थांची चव वाढवण्यासाठी त्यात कृत्रिम रंग टाकले जातात आणि प्रक्रिया केली जाते. यासाठी अनेक पदार्थांचा वापर होतो. ज्यामुळे ट्यूमर होण्याचा धोका वाढू शकतो.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे. सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे






# महाराष्ट्राच्या मातीला लाभला संतांच्या विचारांचा इतिहास!




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्राच्या मातीला संतांच्या विचारांचा आणि अभंगांचा एक प्रदीर्घ सुवर्णमयी इतिहास लाभला आहे. या इतिहासात केवळ भक्तीचा प्रसार झाला नाही, तर शब्दांच्या माध्यमातून परमार्थाचे गुह्य ज्ञान सर्वसामान्यांच्या उंबरठ्यापर्यंत आणण्याचे अथांग कार्य घडले. संत ज्ञानेश्वर माऊली आणि त्यांच्या भावंडांनी भागवत धर्माचा जो पाया रचला, त्यावर नंतरच्या काळात संत एकनाथ महाराजांनी अत्यंत रसाळ आणि तितकाच तात्त्विक डोलारा उभा केला. एकनाथ महाराजांच्या साहित्यात एकीकडे लोकजागृतीचे भारुड धावते, तर दुसरीकडे अत्यंत संथ, गंभीर आणि अर्थपूर्ण अशी भक्तीची अंतर्धारा वाहते. प्रस्तुत अभंग हा याच अंतर्धारेचे एक अप्रतिम प्रतीक आहे, ज्यामध्ये त्यांनी निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर माऊली, सोपानदेव आणि मुक्ताबाई या चार भावंडांच्या नावातील अक्षरांचा आणि त्यांच्या अखंड जपाचा महिमा शब्दांकित केला आहे.

संत एकनाथांची गाथा; मूळ अभंग : ३५४८.

**तीन अक्षरें निवृत्ति । जो जप करी अहोरात्रीं ।**
**तया सायुज्यता मुक्ती । ब्रह्म स्थिति सर्वकाळ ॥१॥**
**चार अक्षरें ज्ञानदेव । जो जप करी धरील भाव ।**
**तया ब्रह्मपदी ठाव । ऐसें शिवादिदेव बोलिले ॥२॥**
**सोपान हीं तीन अक्षरें । जो जप करील निर्धारें ।**
**तयास ब्रह्म साक्षात्कारें । होय सत्वर जाणिजे ॥३॥**
**मुक्ताबाई चतुर्विधा । जो जप करील सदा ।**
**तो जाईल मोक्षपदा । सायुज्य संपदा पावेल ॥४॥**
**ऐसीं हीं चौदा अक्षरें । जो ऐके कर्ण विवरें ।**
**कीं उच्चारी मुखद्वारें । तया ज्ञानेश्वर प्रत्यक्ष भेटे ॥५॥**
**एकाजनार्दनीं प्रेम । जो जप करील धरील नेम ।**
**तयांस पुन्हां नाहीं जन्म । ऐसें पुरुषोत्तम बोलिले ॥६॥**

या अभंगाची रचना अत्यंत गणितासारखी अचूक आणि तरीही रसाळ आहे. नाथांनी या चार भावंडांच्या नावातील प्रत्येक अक्षराला आत्मोन्नतीचा एकेक टप्पा मानले आहे. पहिल्या चरणात ते 'नि-वृ-त्ति' या तीन अक्षरांचा उल्लेख करतात. निवृत्ती म्हणजे संसाराच्या आसक्तीतून मागे फिरणे. जो साधक अहोरात्र या नावाचा नामघोष करतो, त्याला 'सायुज्यता' ही सर्वोच्च मुक्ती लाभते. सायुज्यता म्हणजे केवळ ईश्वराच्या जवळ जाणे नव्हे, तर त्याच्याशी पूर्णतः एकरूप होऊन जाणे. अशी व्यक्ती जीवंतपणीच सदा सर्वकाळ ब्रह्मस्थितीचा अनुभव घेऊ लागते.

दुसऱ्या चरणात 'ज्ञा-न-दे-व' या चार अक्षरांचा महिमा येतो. ज्ञानेश्वर म्हणजे केवळ ज्ञानाचा ईश्वर नव्हे, तर भक्ती आणि प्रज्ञेचा संगम. नाथांच्या मते, जो कोणी अंतःकरणात अनन्य भाव धरून या चार अक्षरांचा जप करेल, त्याला थेट 'ब्रह्मपदी' म्हणजेच परम उच्च पदावर स्थान मिळते. विशेष म्हणजे, हा केवळ नाथांचा शब्द नाही, तर 'ऐसें शिवादिक देव बोलिले' असे सांगून ते या नामाला शिवसंकेताची जोड देतात.

### गुरुमहाराजचरणरज प्रथमेश

तिसऱ्या आणि चौथ्या चरणात अनुक्रमे 'सो-पा-न' आणि 'मु-क्ता-बा-ई' या नावांचा उलगडा होतो. सोपान ही तीन अक्षरे आहेत. सोपान म्हणजे जिना किंवा पायरी. जो साधक दृढ निश्चयाने हा सोपान जपतो, त्याला अत्यंत वेगाने (सत्वर) आत्मसाक्षात्कार होतो. मुक्ताबाई हे नाव चार अक्षरी आहे. आदिमायेचे रूप असलेल्या मुक्ताबाईंच्या नावाचा जो सदा सर्वकाळ जप करतो, तो चारी प्रकारच्या मुक्तींचा स्वामी बनून मोक्षपदाच्या अथांग संपत्तीचा धनी होतो.

या अभंगाचा परमोच्च बिंदू त्याच्या पाचव्या चरणात येतो. नाथांनी या सर्व अक्षरांची बेरीज केली आहेः निवृत्ती (३) + ज्ञानदेव (४) + सोपान (३) + मुक्ताबाई (४) = चौदा अक्षरे. वारकरी संप्रदायात आणि भारतीय तत्त्वज्ञानात चौदा विद्या आणि चौदा भुवनांचे अफाट महत्त्व आहे. नाथ महाराज म्हणतात की, या संपूर्ण ब्रह्मांडाचे सार या चौदा अक्षरांमध्ये सामावलेले आहे. जो साधक ही अक्षरे केवळ आपल्या कानांनी ऐकतो किंवा आपल्या मुखाने त्याचा उच्चार करतो, त्याला सृष्टीचा नियंता आणि ज्ञानोबा माऊली प्रत्यक्ष येऊन भेटतात. येथे बाह्य कर्मकांडाची गरज संपते आणि केवळ शब्दब्रह्माच्या नादातून साक्षात्काराचा मार्ग मोकळा होतो.

शेवटच्या चरणात संत एकनाथ महाराज आपल्या 'एकाजनार्दनी' या मुद्रेचा वापर करून सांगतात, की ज्या साधकाच्या मनात या नामांबद्दल अखंड प्रेम आहे आणि जो नियमाने, निष्ठेने हा नामजप करतो, त्याला या संसारचक्रात पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही. हा पुनर्जन्माचा फेरा चुकणे म्हणजेच अंतिम मोक्ष होय. हा निर्वाळा स्वतः 'पुरुषोत्तम' म्हणजेच भगवान पांडुरंगाने दिला आहे, अशी ग्वाही नाथांनी येथे दिली आहे.

हा अभंग आजच्या धावपळीच्या आणि मानसिक ताणाच्या युगातही तितकाच प्रस्तुत वाटतो. आज जेव्हा माणूस शांततेच्या शोधात अनेक दिशांना भरकटत आहे, तेव्हा संत साहित्य आपल्याला शब्दांच्या आणि नामाच्या अत्यंत सोप्या, पण तितक्याच प्रभावी ताकदीची जाणीव करून देते. चौदा अक्षरांच्या या संकीर्तनातून नाथांनी केवळ संतांप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त केली नाही, तर सामान्यांना संकलित भक्तीचा एक सुलभ महामार्ग दाखवला आहे. जर माऊली महाविष्णू ज्ञानेश्वर महाराजांना भेटायचं असेल तर जरूर संत एकनाथांनी सांगितलेल्या या उपायाची प्रचिती घ्या.

**॥ निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई ॥**

## नारळ सोलताना शेंडी का ठेवतात?

### ९० टक्के लोकांना माहिती नाही हे कारण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नारळ सोलताना त्याच्या देठाच्या बाजूची शेंडी का ठेवली जाते, हे तुम्हाला माहिती आहे का? तर जाणून घेऊया.

**नाजूक भाग**

नारळाचा जो भाग शेंडीमुळे झाकलेला असतो तो अतिशय नाजूक आणि कडक असतो.

**संरक्षण**

नारळाची शेंडी ठेवल्यास त्याचे उन्हापासून आणि धयांपासून संरक्षण होते.



**मदत**

शेंडीमुळे नारळ हातात घट्ट पकडण्यासाठी मदत होते. तसेच ते हातातून निसटून खाली पडत नाही.

**हाताला लागू नये**

नारळ फोडताना हाताला लागू नये, रोडीला पकडून ते फोडता यावे यासाठीही नारळाला शेंडी ठेवली जाते.

**श्रीफळ**

हिंदू संस्कृतीमध्ये नारळाला श्रीफळ मानले जाते. शेंडी हा नारळाच्या शिखराचा भाग असल्याने नारळ ठेवताना शेंडी वरच्या दिशेने असावी, असा नियम आहे. त्यामुळे शक्यतो नारळ सोलताना शेंडी ठेवली जाते.

## उपवासात जांभूळ का खात नाहीत?

### फक्त आध्यात्मिक नाही तर वैज्ञानिक आहे कारण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



भारतीय संस्कृतीत उपवास हा अन्नत्याग नसून आत्मशुद्धी, इंद्रियनिग्रह आणि परमचैतन्याकडे जाण्याचा आध्यात्मिक प्रवास आहे. शरीर आणि मन शांत ठेवण्याचा हा सोहळा आहे.

**जांभूळ टाळण्याची प्रथा**

प्रसिद्ध अध्यात्म संशोधक रघुनाथ येमुल (गुरुजी) यांनी दिलेल्या माहितीनुसार अनेक कुटुंब आणि परंपरांमध्ये उपवासाच्या दिवशी जांभूळ खाणे टाळले जाते. हा नियम केवळ अंधश्रद्धा नसून धार्मिक, आध्यात्मिक आणि वैज्ञानिक विचारांचा सुंदर संगम आहे.

**जम्बूद्वीप**

पुराणांमध्ये पृथ्वीला 'जम्बूद्वीप' म्हटले आहे. हे नाव विशाल जम्बू वृक्षांवरून पडले. जम्बू वृक्ष हे भौतिक जीवन, स्थैर्य आणि देहधर्माचे प्रतीक मानले जाते.

**उपवासाचा उद्देश**

उपवासाचा मुख्य हेतू देहभावातून आत्मभावाकडे जाणे हा आहे. जांभूळ टाळून साधकाला भौतिकतेपासून दूर होऊन आध्यात्मिकतेकडे वळवण्याचा सूक्ष्म संदेश दिला जातो.

**उपवास**

'उपवास' शब्दाचा अर्थच आहे ईश्वराजवळ राहणे. उपवासात शरीर हलके, मन शांत आणि चित्त अंतर्मुख ठेवणे महत्त्वाचे असते.

**आसक्तीचा त्याग**

प्राचीन ऋषी-मुनी आहाराला साधनेचा भाग मानत. आवडते फळ जाणीवपूर्वक टाळणे हे रसना, इच्छा आणि आसक्तीवर नियंत्रण मिळवण्याचे एक साधन आहे.

**नाथ-योग परंपरा**

योग आणि ध्यान परंपरेत शरीरातील प्राणशक्ती संतुलित ठेवणे महत्त्वाचे. जांभूळ हे कषाय गुणधर्माचे फळ असल्याने काही साधना परंपरांमध्ये ते उपवासात टाळले जाते.

**वैज्ञानिक गुणधर्म**

जांभूळमध्ये ANTHOCYANINS, POLYPHENOLS, FLAVONOIDS, ELLAGIC ACID आणि JAMBOLINE सारखे घटक असतात. हे रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत करतात.

**उपवासात का टाळावे?**

उपवासात ग्लुकोजची उपलब्धता कमी असते. अशा वेळी जांभूळाचे सेवन काही व्यक्तींमध्ये अशक्तपणा, चक्कर येणे किंवा ऊर्जा कमी होण्याची शक्यता वाढवू शकते. म्हणून लोकानुभवातून हा नियम विकसित झाला.

**पवित्र वारसा**

जम्बू वृक्षाला आध्यात्मिक महत्त्व आहे. बौद्ध परंपरेतही त्याच्या सावलीत ध्यानाचे उल्लेख आहेत. 'उपवासात जांभूळ टाळा' हा नियम धर्म, आयुर्वेद, योग आणि विज्ञान यांच्या एकत्रित निरीक्षणातून निर्माण झालेली समृद्ध सांस्कृतिक परंपरा आहे.

## स्मशानातून परतताना मागे वळून का पाहत नाही?

### भगवान श्रीकृष्णाने गीतेत सांगितलं..गरुडपुराणातील उल्लेख जाणून घ्या..

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**





जो जन्माला येतो, त्याचा मृत्यू तर अटळ आहे, हे जीवनाचं असं शाश्वत सत्य आहे, जे कोणीही नाकारू शकत नाही, आणि हिंदू धर्मात जन्मापासून मृत्यूपर्यंत असंख्य विधी आणि संस्कार सांगितले आहेत, ज्यांचे प्रत्येकाने पालन करणे गरजेचे ठरते. आज आपण गरुड पुराणानुसार जाणून घेणार आहोत, अंत्यविधीनंतर कधीही मागे वळून का पाहू नये? भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णाने नेमकं काय सांगितलंय...

**स्मशानभूमीकडे मागे वळून न पाहण्याची प्रथा नेमकी काय आहे? (GARUD PURAN)**

या पृथ्वीवर जन्मलेल्या प्रत्येकासाठी मृत्यू अटळ आहे. असे म्हटले जाते की मृत्यूनंतर व्यक्तीचा आत्मा दैवी शक्तीमध्ये विलीन होतो. मृत्यूनंतर अनेक विधी सांगितले आहेत. हिंदू धर्मात एकूण १६ विधी सांगितले आहेत, त्यापैकी १६ वा विधी म्हणजे अंतिम संस्कार. जे लोक अंत्यविधीसाठी स्मशानभूमीत जातात, ते अनेकदा अज्ञान किंवा केवळ माहितीच्या अभावामुळे काही कृत्ये करतात. यापैकीच एक म्हणजे दहन झाल्यावर स्मशानभूमीकडे मागे वळून न पाहण्याची प्रथा. याचा उल्लेख गरुड पुराणात आहे. जाणून घेऊया...

**मृत्यूनंतर आत्म्याचे अस्तित्व? गीतेत भगवान कृष्णाने सांगितलंय...**

गरुड पुराणानुसार, मृत्यूनंतर आत्मा शरीर सोडून जातो. अंतिम संस्कारानंतर शरीराची राख होते, परंतु आत्मा अस्तित्वात राहतो. गीतेत भगवान कृष्णाने सांगितले आहे की आत्मा शाश्वत, अमर आणि अविनाशी आहे. कोणतेही शस्त्र त्याला मारू शकत नाही, अग्नि त्याला जाळू शकत नाही, किंवा पाणी त्याला बुडवू शकत नाही.

**जेव्हा कुटुंबातील एखादा सदस्य दहनानंतर मागे वळून पाहतो तेव्हा...**

गरुड पुराणानुसार, जेव्हा एखादी व्यक्ती मरण पावते, तेव्हा तिला अंतिम संस्कारांसाठी स्मशानभूमीत नेले जाते. असे म्हटले जाते की या विधीनंतर आत्मा दुसऱ्या जगात जातो. जेव्हा कुटुंबातील एखादा सदस्य दहनानंतर मागे वळून पाहतो, तेव्हा आत्म्याची कुटुंबाप्रती असलेली आसक्ती त्याला निघून जाण्यापासून रोखते. म्हणून, मृताच्या आत्म्याला शांती मिळावी यासाठी १३ दिवस अनेक विधी केले जातात.

**आत्म्याला परलोकात जाण्यासाठी संघर्ष करावा लागू शकतो...**

गरुड पुराणात असे म्हटले आहे की मृत्यूनंतर, आत्मा त्याच्या अंतिम संस्कारांचे सर्व विधी पाहतो. मृताचे कुटुंबीय स्मशानभूमीत उपस्थित असल्यामुळे आणि त्या व्यक्तीचे त्यांच्याशी भावनिक नाते असल्यामुळे, मागे वळून तुमच्याकडे पाहिल्याने त्यांचे तुमच्यावरील प्रेम अधिकच वाढेल आणि तुमचे त्यांच्याशी असलेले नाते तुटणार नाही. यामुळे आत्म्याला परलोकात जाण्यासाठी संघर्ष करावा लागू शकतो. म्हणूनच असे म्हटले जाते की, अंत्यविधीनंतर मागे वळून पाहू नये.

## जुन्या काळातील लग्न

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



लग्नामध्ये आहेर केल्यानंतर माईकवरून पुकारायची पद्धत होती. अमुक-अमुक एक रुपया, तमुक-तमुक दोन रुपये, अशा प्रकारे. ज्याचा आहेर अकरा रुपये किंवा त्याच्या वर असेल, त्याच्याबद्दल तर खूप भारी वाटायचे. त्याच्यानंतर लग्नानंतर दोन-चार दिवसांतच नवरदेव त्याला लग्नात हुंडा म्हणून मिळालेला रेडिओ गळ्यात घालून, मिळालेल्या सायकलवर ऐटीत टांग टाकून आणि मिळालेले हँडो सँडोचे घड्याळ हातामध्ये सगळ्यांना दिसेल दिमाखात दाखवत, गावात पूर्ण फेरफटका मारायचा, त्यावेळेस त्याची शान काही औरच होती. आत्ताच्या नवरदेवांना त्याच्या शंभर पट मिळाले, तरी त्याची सर येणार नाही हे नक्की!

लग्नाच्या दोन दिवस अगोदर सर्वांसोबत बुंदी बनविण्यासाठी केलेले जागरण किंवा लापशी वा भात बाजेवर टाकून नंतर वाढायला घेताना अक्षरशः वापरलेले फावडे, पिण्यासाठी नदीवरून बैलगाडीने टिपाड भरून आणताना पूर्ण ओलेचिंब होणे, हे सर्व इतिहासजमा झाले आहे. लग्नाआधी मुला-मुलीच्या वडिलांसोबत त्यांना घालावयाची आंघोळ, त्यानंतर सर्वांना आग्रहाने धरून आणून कपाळभर भरलेला मळवट, त्यावरून लावलेली चमकी सगळे नव्या पिढीला पटणार देखील नाही... कालाय तस्मै...

'आली ईईईईई लग्नघटी समीप नवरा'... अशी आरोळी कानावर पडली, की बूड झटकायला सुरूवात करायची. नंतर वाजवा रे वाजवा .... असे भटजी म्हणला, की मंडपाच्या बांबूला पाठ लावून बसायचे... जेणेकरून 'तदेव लग्नम सुजनम तदेव.. ताराबलम चंद्रबलम' ऐकायच्या आत मुठीत कोंबलेल्या रंगीत अक्षता नवरानवरीच्या अंगावर बचकन फेकून पायाला रुतणारे ढेकळ बाजूला करायचे ... पहिली पंगत! गावातील लग्नात जेवायची ही गंमत ज्यांनी अनुभवली असेल, त्यांना कोणत्याही महागड्या हॉटेलात अजिबात मज्जा येणार नाही. तिकडे नवरा-नवरी होमाभोवती गिरक्या मारेपर्यंत पत्रावळीवाला पंगतीत फिरायला सुरूवात करतो. (पत्रावळी म्हणजे पळसाची पाच-सहा पाने काड्यांनी शिवून बनवलेले ताट) या पत्रावळी निम्म्या तरी फाटलेल्या असत. त्यामुळे दोन जोडून घ्याव्या लागत. पत्रावळी वाटणारी मंडळी विशेष क्रूर आणि निष्ठूर का असत कोण जाणे. फाटलेली पत्रावळ बघून सुद्धा मुद्दाम दुसरी पत्रावळ देत नसत... आणि जर दिलीच तर तीही एकदम तुकडा झालेली. जणू लग्न यांच्या घरचे असते, अशा थाटात तुच्छ कटाक्ष टाकून बघत.

पत्रावळ ढेकळांवर ठेवली की ती सरळ कधीही राहत नसे. त्यासाठी खाली ढेकळांची खास सेटिंग करावी लागे. कशीबशी पत्रावळ सेट केली, तर वारा येई आणि ही बया इकडे-तिकडे उडू लागे. त्यासाठी एक वजनदार ढेकूळ पत्रावळीवर ठेवावा लागे. पत्रावळी स्थानापन्न झाल्या, की मीठ वाढणारा अतिशय घाईत असणारा येई आणि कुठल्याही भिंतीवर निर्लज्जपणे थुंकल्यासारखा बरोबर मध्यभागी मिठाची बचक सोडे. याना पत्रावळीला काठ असतात हे माहीत नसावे. त्याच्या मागोमाग बुंदी वाढणारे झांजपथक येते. जेथे मीठ वाढले आहे त्यावर नेम धरून बुंदी वाढायची असा प्लान करून आलेले असत, दुष्ट साले. सगळी बुंदी खारट होऊन जाई.

मीठ आणि बुंदी कष्टपूर्वक वेगळे करेपर्यंत मोठ्या टोपलीत भात घेऊन दोघेजण पळत येत. दोघांच्या हातात भात वाढायला चहा प्यायच्या बशा असत. एकाच वेळी दोन पंगती वाढताना टांग्याला जुंपलेल्या बिगरखांदी बैलांसारखे शिवळा ताणत पुढे पुढे धावत. बुंदीच्या अंगावर सांडलेला भात बाजूला करेपर्यंत वरणाची बादली येई. वरण वाढणारी मंडळी बिनडोक असत. भाताचे कितीही छान आळे बनवले तरी तो वरण नावाचा द्रव आळ्याच्या बाहेर ओतायचा चंग बांधून आलेले असत. भाताचा कोथळा फोडून बाहेर वाहणारे वरण आवरता आवरता जेवणारा घामेघुम होऊन जाई.

वरणाची बादली पुढे सरकल्यावर मागून झणझणीत वांगे उसळीची बादली नाचत येते. उसळीत घुसवलेले वग्राळे तर्र्र्र्रीसकट बाहेर येई आणि पत्रावळीवर उताणे होई. यामुळे नुकताच कालवून ठेवलेला वरणभात आणि निसून ठेवलेली बुंदी मिठाच्या ढिगाऱ्यासह ओलेचिंब होई.

काड्यांनी शिवलेल्या पत्रावळीने एव्हाना दम तोडलेला असे. तिच्या फटीमधून वरण आणि उसळीचा रस्सा ढेकळात झिरपू लागतो... एखादा ओघळ पत्रावळीचे काठ ओलांडून थेट वाढणाऱ्याच्या पायांखाली लोटांगण घालतो... त्यात जरका सोसाट्याचा वारा आला तर गम्मत नका विचारू...

शेताच्या बांधावरचा पाचोळा, घरामागच्या उकिरड्यावरची राख आणि नुकतीच कापून फेकलेल्या हरळीची पाने कालवलेल्या भातावर येऊन बसत. आता भातातून बुंदी निवडायची की हरळीची पाने या संभ्रमात असलेला जेवणारा 'वदनी कवळ घेता नाम घ्या श्री हरीचे' ही राकट, चिडलेल्या आवाजातली आरोळी ऐकतो आणि पहिली बुंदीची बचक तोंडात सारी.

बुंदी खाताना मंडपाच्या छताकडे बघायला लागे. त्यामुळे खाली पत्रावळीत गुपचूप येऊन पडलेली मणभर भाताची बशी बघायला चान्स नाही. मागून तिच्या अंगावर तुटून पडणारा वरणवाला सरकारी काम असल्यासारखा भडकन वरण ओतुन पळूनही जाई. काही मिनिटांतच पत्रावळीतून जसे पाणी खाली झिरपते, तसाच खालचा ढेकूळ पत्रावळीत झिरपून वर येऊ लागे. आधीच बुंदी आणि उसळीत रंगलेला भात ढेकळाच्या नामस्मरणात कधीच सावळा विठ्ठल बने...

बाराचे लग्न अडीच ला लागलेले असते, त्यामुळे खाणारे पत्रावळीच्या दुर्दशेकडे न बघता एकामागे एक ढिगारे संपवत इतस्ततः पसरलेले मीठ बोटांवर चोळून पत्रावळीची घडी करत... ती पुन्हा उडू नये म्हणून तिच्या बोकांडी मोठा ढेकूळ ठेवत आणि पाण्याच्या टँकरकडे धावत. एकाच पाईपला ठिबक सिंचनच्या दहा नळ्या जोडून चिखलात रुतलेला हा स्थितप्रज्ञ पाईप अर्धे पाणी खाली सांडवत असे...

पहाटे ५ वाजता भरून आणलेला थंड पाण्याचा टँकर एव्हाना अंघोळीच्या पाण्यासारखा गरम झालेला असे. प्लास्टिकच्या रंगीबेरंगी ग्लासातून दोन घोट पाणी पिऊन नवरा नवरीला आशीर्वाद देत लोक आल्या मार्गाला लागत... येताना खिशात लपवलेला प्लास्टिकचा ग्लास म्हणजे त्यांना ऑस्कर पुरस्कार वाटत असावा... २-५ रुपये आहेर केल्याच्या बदल्यात पोटभर धूळयुक्त जेवण आणि एक प्लास्टिकचा ग्लास...

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)